जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २६५ दिनांक - २१/०६/२०२४**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## काञज नवीन हायवेवरील स्वामीनाराण मंदीराजवळील पडक्या उंच इमारतीवर जिवाची पर्वा न करता धोकादायक रिल्स बनविणा-यांवर तरुण व तरुणीवर कारवाई

दि.२०/०६/२०२४ रोजी नवीन कात्रज हायवे वरील स्वामी नारायण मंदीर येथील पडक्या उंच इमारतीवरुन एक तरुणी व एक तरुण यांनी त्यांचा जिव धोक्यात टाकुन एक धोकादायक व्हीडीओ तयार करुन त्याची रिल्स बनविली होती. ती रिल्स सोशल मिडीआवर व्हायरल झाली होती. त्यावेळी भारती विद्यापीठ पोलीसांनी व्हीडीओची खात्री करुन एक अनोळखी तरुण मुलगा व एक अनोळखी तरुण मुलगी यांचेवर स्वतःचे व इतरांचे जिवीत व व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती केली आहे म्हणुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ५१५/२०२४, भादंवि कलम ३०८,३३६,३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

दाखल गुन्हयाचे तांत्रिक विश्लेषण करुन त्यामध्ये दोन आरोपी निष्पन्न झाल्याने त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,पुणे श्रीमती स्मार्तना पाटील, मा. सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्रीमती नंदीनी वग्याणी यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री डी.एस.पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.शरद झिने, व भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे. तसेच **अशा प्रकारे कोणीतीही धोकादायक कृत्य न करणेबाबत पुणे पोलीसांकडुन जनतेस आवाहन करण्यात येत आहे.**